नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २६/०४/२०२५ (शनिवार)**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद, ६१ लाख १४ हजारांचा मुद्देमाल जप्त, रामटेक पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक २५/०४/२०२५ रोजी रामटेक पोलीस हद्दीत पेट्रलिंग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे रामटेक पोलीसांनी खालील प्रमाणे कारवाई केली.

**कारवाई क्र. १** पोलीसांनी दुधाळा ते भिलेवाडा रोडवर गुरू अग्रों कंपनी जवळ नाकाबंदी केली असता एक **टिप्पर क्र. एम.एच.४० ऐ.के. ०६१५ हे वाहन मिळुन आले.** वाहन थांबवुन पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **वाहन चालक आरोपी नामे आनंदराव रामदास भुरे, वय ४१ वर्षे, रा. रामनगर, वार्डनं. ०२, पिपरी कन्हान ता. पारशिवनी जि. नागपूर याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. तसेच सदर वाहन मालकाचे नाव करण राजेश सोमकुवर वय २० वर्ष रा. सिहोरा, कन्हान ,ता. पारशिवनी जि. नागपूर असे असल्याबाबत माहीती पोलीसांना प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष १) ९ ब्रास रेती आणि २) एक **टिप्पर क्र. एम.एच. ४० ऐ.के. ०६१५ असा एकुण ३०,५४,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई क्रं २** :— पोलीसांनी मौजा चारगाव रोड चुनाभट्टी जवळ नाकाबंदी केली असता **टिप्पर क्र. एम.एच.४० सी.टी. १२०७ हे वाहन मिळुन आले.** वाहन थांबवुन पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **वाहन चालक आरोपी नामे प्रकाश बुध्दराम शेंडे , वय ३५ वर्षे , रा. आंबाटोली समतानगर, नागपूर याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. तसेच सदर वाहन मालकाचे नाव अनिल ठाकरे, वय ४० वर्ष रा. खसाळा, नागपूर असे असल्याबाबत माहीती पोलीसांना प्राप्त झाली.**

पोलीसांनी पंचासमक्ष **१) १० ब्रास रेती आणि २)** एक **टिप्पर क्र.एम.एच.४० सी.टी. १२०७ असा एकुण ३०,६०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**पोलीसांनी दोन्ही कारवाई मध्ये १९ ब्रास रेती आणि दोन टिप्पर असा ६१,१४,०००/— रूपयांचा मुद्‌देमाल जप्त केला आहे.**

नमुद वाहन चालक आणि मालक **यांच्या** विरूध्द पोस्टे रामटेक येथे **कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम , कलम ०३ सार्व. संपत्ती नुकसान प्रतिबंध अधि. अन्वये २ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.**

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद काटोल पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन काटोल**:— दिनांक २३/०४/२०२५ रोजी पोस्टे काटोल पोलीस पोस्टे परीसरात पेट्रोलींग करीत असता गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, **पांढऱ्या रंगाच्या रेनॉल्ट डस्टर कार क्रमांक एम. एच. ३१ इ.यु ४२२२** या वाहनाने प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी **नरखेड ते काटोल रोड मौजा घुबडमेट चौक** येथे नाकाबंदी केली असता रेनॉल्ट डस्टर कार क्रमांक एम एच ३१ इ.यु ४२२२ येतांना दिसली. सदर वाहन थांबवुन पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता वाहनामध्ये मागील सिटवर विक्रीसाठी वाहतुक होत असलेला १ सुगंधित तंबाखु जाफरानी जर्दा क्र १ चे १ किलो वजनाचे १०० पाकीटे आणि २. सुगंधित तंबाखु गोल्डन सफारी चे १० पाकीटे आढळुन आले. वाहन चालक **आरोपी नामे प्रविण पांडुरंगजी उज्जैनकर, वय ३२ वर्ष रा. प्लॉट क्र २६ ,न्यु इंदीरानगर ,नविन नरसाळा रोड, नागपुर याला** वाहनात मिळुन आलेल्या प्रतिबंधीत तंबाखु बाबत विचारपुस केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. **आरोपीचे ताब्यातुन १ सुगंधित तंबाखु जाफरानी जर्दा क्र १ चे १ किलो वजनाचे १०० पाकीटे किंमती ५५,०००/— रूपये , २. सुगंधित तंबाखु गोल्डन सफारी चे १० पाकीटे किंमती ५५००/— रूपये आणि ३. रेनॉल्ट डस्टर कार क्रमांक एम एच ३१ इ.यु ४२२२ किंमती ५,००,०००/—रूपये असा एकुण ५,६०५००/—रूपयांचा मुद्‌देमाल जप्त करण्यात आला आहे.**

नमुद आरोपीविरूद्ध पोस्टे काटोल येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**नमुद आरोपीला पोलीसांनी अटक केली आहे.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**